दै. पुढारी, दि. २ डिसेंबर १९८९ पान पाच

# सहकार मंडळाच्या वक्तृत्व स्पर्धेत कु. जयश्री पाटील प्रथम

कोल्हापूर, दि. १ : कोल्हापूर जिल्हा सहकारी मंडळातर्फे महाविद्यालयीन तरूणांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत पहिली तीन बक्षिसे अनुक्रमे कु. जयश्री श्रीपतराव पाटील, पांडुरंग दत्तात्रय भोसले व तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस विभागून कु. विजयमाला कृष्णराव आबिटकर व राजाराम शिवाजी थोरूसे यांना देण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

नुकतीच येथील तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्रात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत सात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला परिक्षक म्हणून, डॉ. डी. यू. पवार, प्रा. ज. ब. हवालदार, प्रा. पी. ए. कोळी यांनी काम पाहिले.

पारितोषिक वितरण कार्यक्रम कोल्हापूर जिल्हा सहकारी मंडळाचे अध्यक्ष च. जो. वाडेकर यांच्या हस्ते झाले. शेवटी जी. बी. गंगापुरे यांनी आभार मानले.

* अलाहाबाद : एका वकिलाच्या दिशेने केलेल्या शक्तीमान बॉंबच्या हल्ल्यात वकील आणि त्याचा साथीदार ठार झाले असून सहाजण जखमी झाले आहेत.